CNR No.
MHAU03-037520-2025

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४४३९/२०२५**
**पल्लवी व इतर विरुध्द भिमराव.**

**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४४३९/२०२५ मधील निशाणी ०५ खालील आदेश</u>**

अर्जदार क्र.१ व २ यांनी प्रस्तुतचा अर्ज ई–फाईलींगद्वारे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १४४ अन्वये अंतरिम पोटगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

**अर्जदार हिच्या प्रस्तुत अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे,**

०२. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार हे पती–पत्नी असून त्यांचा विवाह दिनांक ०४/०४/२०१६ रोजी बौध्द धर्माच्या रितीजिवाजा प्रमाणे आदीत्य सेवा सदन, हिवरखेड रोड, तेलारा, जि. अकोला येथे झालेला आहे. सदरचे विवाहाच्या वेळी अर्जदाराच्या आई–वडीलांनी लग्नात सोने व चांदीच्या दांगिन्यांचा खर्च केला आहे. सदर लग्न संबंधातून सुहानी नावाची मुलगी आहे.

०३. विवाहानंतर अर्जदार ही गैरअर्जदार यांच्या एकत्र कुटुंबातील घरात नांदण्यासाठी गेली. एक ते दीड महिन्यानंतर अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार हे नागपुर येथे रहाण्यास गेले. गैरअर्जदार हे विद्युत विभागात नोकरीस असल्यामुळे ते सकाळी नोकरीवर जात असत. परंतु काही दिवसानंतर गैरअर्जदार हे संध्याकाळी दारु पिवुन घरी येवु लागले. तेंव्हा त्यांना दारु पिण्यास विरोध केला असता अर्जदार क्र.१ हिस शिवीगाळ व मारहाण केली. गैरअर्जदार हा अर्जदार क्र.१ हिला शारीरीक व मानसिक त्रास देत होते. अर्जदार क्र.१ ही गर्भवती असतांना तिच्या वडीलांनी धान्य व पैसे वेळोवेळी पाठवले होते. अर्जदार क्र.१ हिला मुलगी झाल्यामुळे गैरअर्जदार यांच्याकडील नातेवाईक बघण्यास देखील आले नाहीत. एप्रिल २०२० मध्ये अर्जदार क्र.१ ही पुन्हा गर्भवती राहीला तेव्हा गैरअर्जदार याने तिच्या मनावरुिध्द गर्भपात करुन आणला. फेब्रुवारी २०२१ मध्ये सकाळी ८.३० वा.चे दरम्यान गैरअर्जदार यांनी तिला मारहाण करुन घराबाहेर काढुन दिले. तेंव्हापासुन ती माहेरी राहत आहे. गैरअर्जदार यांचे गावामध्ये मोठे घर व बारा एकर बागायती शेती आहे. गैरअर्जदार हे

इलेक्ट्रीशन म्हणुन व्यवसाय करतात. त्यातुन दरमहा पाच ते सहा लाख रुपये गैरअर्जदार हे कमवितात. अर्जदार क्र.१ व २ यांना प्रत्येकी २०,०००/– रुपये पोटगी द्यावी अशी विनंती अर्जदारांनी केली आहे.

०४. गैरअर्जदार यांनी ई-फायलिंगद्वारे म्हणणे दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज नाकारला. गैरअर्जदार यांचे म्हणण्यानुसार प्रस्तुतचा अर्ज व त्यामधील कथने खोटी व चुकीची आहेत. विवाहनंतर अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार हे नागपुर येथे राहण्यास गेले, त्यामुळे अर्जदार ही कधीही गावी येत नव्हती. अर्जदार क्र.१ ही अत्यंत तापट स्वभाची असुन मोठया शहरात राहीलेली आहे. त्यामुळे तिला खेडेगांव राहणे पसंत नव्हते. गैरअर्जदार हा विद्युत विभागात नोकरी करत असतांना त्याला नेहमी रात्रपाळीत कामाला जावे लागत असे. त्यामुळे त्याने अर्जदारासोबत राहण्यासाठी तिच्या भावाला शिक्षणाकरिता नागपुर येथे बोलावुन घेतले. तिच्या भावाचा शिक्षणाचा संपुर्ण खर्च त्याने केला आहे. जागतिक महामारीमुळे गैरअर्जदाराची नोकरी गेली. त्यामुळे अर्जदार सतत त्याला घालुन पाडुन बोलत असे. गैरअर्जदार याने अर्जदार क्र.१ हिच्यासोबत चांगला संसार थाटण्याकरिता नागपुर येथील मौजे खैरी येथे १२०० चौरस फुटचा प्लॉट विकत घेतला होता. सदर प्लॉट अर्जदार क्र.१ हिने गोडी गुलाबीने गैरअर्जदारापासुन मुखत्यारपत्र करुन घेतले व पंचवीस लाख रुपयांना प्लॉट विकुन टाकला व सदर रक्कम तिच्या वडीलांना परस्पर दिल्याचे सांगितले.

०५. अर्जदार क्र.१ हिने स्वत: गैरअर्जदाराचा त्याग केला आहे. अर्जदार क्र.१ हिचे एम.ए.पर्यंत शिक्षण झाले आहे. ती इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंत मुलाचे शिक्षाणाचे क्लास घेते. त्यात त्यापासुन तिला तीस ते पसतीस हजार रुपये उत्पन्न मिळते. तसेच स्वत:चे तिचे पार्लर असुन त्यातुन तिला चाळीस हजार रुपये महिन्याला मिळतात. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी विनंती गैरअर्जदाराने केली आहे.

०६. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार हिने तिचे मालमत्ता संदर्भातील प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. गैरअर्जदार याने त्याचे मालमत्ता संदर्भातील प्रतिज्ञापत्र दाखल ई-फायलींगद्वारे दाखल केलेले

आहे. अर्जदार हिने प्रस्तुत अर्जाचे कामी अंतरिम पोटगी मिळण्याची विनंती केलेली आहे. सबब अर्जदार हिचे मागणीचा विचार करता प्रथमतः गैरअर्जदार यांनी अर्जदार यांचे पालन-पोषण करण्यास टाळाटाळ केली आहे का, ही बाब अर्जदार हिला प्रथमदर्शनी शाबित करणे गरजेचे आहे.

०७. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या कथनांचा विचार करता अर्जदार ही गैरअर्जदार याची पत्नी व अर्जदार क्र.२ ही मुलगी असल्याबाबत दोन्ही पक्षकारांमध्ये वाद नाही. अर्जदार हिच्या कथनानुसार गैरअर्जदार याने तिला नांदविण्यासाठी कधीही प्रयत्न केले नाहीत.

०८. अर्जदार हिच्या कथनांनुसार गैरअर्जदार यांनी त्यांचे पालन-पोषण केले नाही. दवाखाना, मुलभुत गरजांची जबाबदारी पार पाडलेली नाही. अर्जदार हिने सदर अर्जातील कथनांच्या पृष्ठयर्थ शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदार व गैरअर्जदार हे सध्या स्वतंत्र राहत आहेत, याबाबत दोन्ही पक्षकारांमध्ये वाद नाही. गैरअर्जदार याने अर्जदार क्र.१ व २ यांची पालन-पोषण केले किंवा त्यांच्या मुलभुत गरजा पुर्ण केला असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे अर्जदार हिचेबाबत गैरअर्जदार यांनी पालन-पोषण करण्यास टाळाटाळ केली, असा प्रथमदर्शनी निष्कर्ष नोंदवणे न्यायोचित दिसुन येते. त्यामुळे अर्जदार ही मागणी केल्याप्रमाणे गैरअर्जदार याचेकडुन अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय हे पाहणे गरजेचे आहे.

०९. अर्जदार हिने तिचे अर्जामध्ये तिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही असे कथन केलेले आहे. अर्जदार हिने तिचे मालमत्ता संदर्भातील प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल करुन तिला दरमहा रक्कम रु.२०,०००/- इतका एकुण खर्च येतो, असे कथन केलेले आहे. तसेच अर्जदार हिने तिचे मालमत्ता संदर्भातील प्रतिज्ञापत्रात गैरअर्जदार याला किती पगार मिळतो व काय काम करतो, हे नमुद केले नाही.

१०. गैरअर्जदार याने ई-फायलींगद्वारे मालमत्ता संदर्भातील प्रतिज्ञापत्र दाखल केले दाखल केलेले नाही.

११. अर्जदार हिच्या अर्जातील कथनांचा व तिने दाखल केलेल्या मालमत्ता संदर्भातील प्रतिज्ञापत्रांचा व त्यामधील कथनांचा विचार करता गैरअर्जदार हा इलेक्ट्रीशन असुन त्याला दरमहा उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदार याने त्याच्या कथनाप्रमाणे अर्जदार हिला खाजगी क्लासेसमधुन दरमहा ३२ ते ३५ हजार पगार मिळतो, असे कथन केले आहे. परंतु त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

१२. वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार हिला सध्या उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही, असे प्रथमदर्शनी अभिलेखावरुन दिसुन येत आहे. गैरअर्जदार याने त्याच्या जबाबात तो विद्युत विभागात नोकरी करत होता, परंतु सध्या तो बेरोजगार असुन त्याला उत्पन्नाचे साधन नाही, असे कथन केले आहे. गैरअर्जदार हा विद्युत विभागात यापुर्वी नोकरी करत होता त्यामुळे त्याला सदर कामाचा अनुभव आहे व तो धडधाकट देखील आहे. त्यामुळे नोकरी जरी नसली तरी मजुरी करुन तो अर्जदार यांचे पालन-पोषण करु शकतो. त्यामुळे गैरअर्जदार याला उत्पन्न मिळते असे प्रथमदर्शनी दिसून येते. अर्जदार ही क्लासेस घेत असल्याबाबत व ब्युटी पार्लर असल्याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे तिला उत्पन्नाचे साधन नाही असे प्रथमदर्शनी दिसून येते.

१३. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार याची पत्नी व अर्जदार क्र.२ ही मुलगी असल्याबाबतची बाब त्याने नाकारलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिचा पत्नी म्हणुन व अर्जदार क्र.२ चा मुलगी म्हणुन योग्यप्रकारे सांभाळ करण्याची व त्यांचा उदरनिर्वाहाची योग्य ती सोय करण्याची संपुर्ण जबाबदारी ही गैरअर्जदार याच्यावर आहे. सदरची जबाबदारी गैरअर्जदार हा नाकारु शकत नाही. वर कथन केल्याप्रमाणे अर्जदार ही सध्या कोणताही कामधंदा करीत नाही असे प्रथमदर्शनी दिसुन येते. तसेच गैरअर्जदार याने कथन केल्याप्रमाणे त्याच्यावर त्याच्या आई-वडीलांची जबाबदारी असल्याची व त्याला खर्च येत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गैरअर्जदार याच्या उत्पन्नाचा व त्याचे खर्चाचा विचार करता गैरअर्जदार याचेकडुन अर्जदार क्र.१ व २ यांना अंतरिम पोटगी म्हणुन प्रत्येकी रक्कम रु.४,०००/- इतकी पोटगी मंजुर करणे न्यायोचित दिसुन येते.

१४. सबब, वर नोंदविलेल्या निरीक्षणांवरुन व निष्कर्षांवरुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदार क्र.१ व २ यांचा प्रस्तुतचा अर्ज (निशाणी ०५) अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार याने अर्जदार क्र.१ व २ यांना प्रस्तुतचा मुळ अर्ज दाखल झालेल्या दिनांकापासुन प्रस्तुतचा मुळ अर्ज निकाली होईपर्यंत दरमहा प्रत्येकी रक्कम रुपये ४,०००/- इतकी अंतरिम पोटगी द्यावी, असा गैरअर्जदारयास आदेश करण्यात येतो.

३. सदर आदेशाची एक प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SNEHAL SHANKAR JADHAV
Date: 2026.03.30 17:40:57 +0530

**दिनांक – ३०/०३/२०२६**
**ठिकाण - औरंगाबाद**

**(स्नेहल एस. जाधव)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.१३) औरंगाबाद.**